स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


**संदर्भ : रासेयो/२०२६–२७/१५६** **दि. २१/०७/२०२६**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**फक्त पुणे शहर**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : पाठलाग आणि सायबर पाठलाग प्रतिबंध** (Prevention of Stalking and Cyber Stalking)
**जनजागृती कार्यक्रमाकरिता विद्यार्थीनी उपस्थित राहणेबाबत**

**संदर्भ : १. ममआ/२०२६/रामआयशदा कार्यशाळा/का–०३/५७२, दि. १६/०७/२०२६ रोजीचे महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे पत्र**

**संदर्भ : २. मा. कुलगुरू कार्यालय यांच्या मार्फत सं.क्र. १ चे पत्र आवक क्र. ४०७५, दि. २०/०७/२०२६ रोजी नुसार अग्रेषीत**

महोदय/महोदया,

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींकरिता '**पाठलाग आणि सायबर पाठलाग प्रतिबंध** (Prevention of Stalking and Cyber Stalking) **ची समस्या**' या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली आहे.

सध्याच्या डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असून, विशेषतः तरूण मुली आणि महिलांना या समस्येचा मोठ्या प्रमाणावर सामना करावा लागत आहे. या समस्येची गांभीर्याने दखल घेत, जनजागृती करणे आणि प्रतिबंधात्मक उपायांवर चर्चा करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे.

तरी '**पाठलाग आणि सायबर पाठलाग प्रतिबंध** (Prevention of Stalking and Cyber Stalking) **ची समस्या**' जनजागृती कार्यक्रमाकरिता आपल्या महाविद्यालयातील इच्छुक २ विद्यार्थिनींना **गुरूवार, दि. २३ जुलै, २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत, स्थळ : यशदा** (YASHADA), **राजभवन कॉम्प्लेक्स, बाणेर रोड, पुणे** याठिकाणी सहभागी होण्याबाबत सूचित करावे. सहभागी स्वयंसेविका व प्राध्यापकांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

Bhame.

**संचालक (अतिरिक्त कार्यभार)**
**राष्ट्रीय सेवा योजना**

**टिप : महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचे पत्र**

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 20 JUL 2026
आवक क्रमांक व्हीसी 4075
जावक दिनांक 20 JUL 2026

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission for Women**

गृहनिर्माण भवन ( म्हाडा बिल्डिंग )
पोटमाळा, कलानगर, बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 2707
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Toll Free No. 155209
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

---

क्रमांकः ममआ/२०२६/रामआयशदा कार्यशाळा/का-०३/572
दिनांकः १६.०७.२०२६

DIR - BSD
DIR - MV

प्रति,
मा. प्राचार्य,
सावित्रीबाई फुले युनिव्हर्सिटी,
गणेशखिंड, पुणे- ४११००७

विषयः "पाठलाग आणि सायबर पाठलाग प्रतिबंध" (Prevention of Stalking and Cyber Stalking) या जनजागृती कार्यक्रमास ५० विद्यार्थिनींना उपस्थित राहण्याबाबत.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने, " पाठलाग आणि सायबर पाठलाग प्रतिबंध (Prevention of Stalking and Cyber Stalking) ची समस्या" या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर एका विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सध्याच्या डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असून, विशेषतः तरुण मुली आणि महिलांना या समस्येचा मोठ्या प्रमाणावर सामना करावा लागत आहे. या समस्येची गांभीर्याने दखल घेत, जनजागृती करणे आणि प्रतिबंधात्मक उपायांवर चर्चा करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे. या कार्यशाळेचा तपशील खालीलप्रमाणे आहेः

**दिनांक :** गुरुवार, 23 जुलै 2026
**वेळ** : सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५.००
**स्थळ** : यशदा (YASHADA), राजभवन कॉम्प्लेक्स, बाणेर रोड, पुणे.

तुमच्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी हा विषय सध्याच्या डिजिटल युगात अत्यंत आवश्यक आहे. कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना या विषयाचे कायदेशीर आणि सामाजिक पैलू समजून घेणे नक्कीच उपयुक्त ठरेल.

तरी, या महत्त्वपूर्ण कार्यशाळेसाठी आपल्या महाविद्यालयातील किमान ५० विद्यार्थिनींना उपस्थित राहण्यासाठी परवानगी द्यावी आणि त्यांना पाठवण्याची व्यवस्था करावी, ही नम्र विनंती.

आपली नम्र,

(सकिना शरीफ)
समुपदेशक नि प्रकल्प अधिकारी

Bhanu 20/07/2026